27 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शहर परिसरात संविधान दिना निमित्त घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

**विद्यापीठात संविधान दिन, शहीद दिन**

शिवाजी विद्यापीठात संविधान दिन व शहीद दिनानिमित्ताने भारतीय संविधानकर्ते आणि वीर शहीद जवान यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संविधानाची प्रास्ताविका, संविधानाची मूळ प्रत यांना अभिवादन करण्यात आले. '२६/११'च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांसह अन्य शहीदांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. डॉ. शिवराज थोरात यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, गजानन पळसे, अजित चौगुले, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नमिता खोत, अभय जायभाये आदी उपस्थित होते.

**विवेकानंद महाविद्यालय :** विवेकानंद महाविद्यालयात घटनेच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार यांनी विद्यार्थ्यांकडून सरनाम्याचे वाचन करून घेतले. प्रा. समीक्षा फराकटे यांनी आभार मानले.

**मिलिंद हायस्कूल :** मिलिंद हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक एम. एम. शिर्के यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी संविधानाबाबत मनोगत व्यक्त केले.



**कोल्हापूर : विद्यापीठात संविधान दिनानिमित्त संविधान प्रास्ताविकेप्रती कृतज्ञता व्यक्त करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. अजित चौगुले, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नमिता खोत, गजानन पळसे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

यावेळी एस. बी. पडवळ, बी. एम. नदाफ, जे. जी. कदम आदींसह शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

**पिपल्स रिपब्लिकन पार्टी :** बिंदू चौक येथे डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास करवीर विभागाचे माजी पोलिस उपनिरीक्षक आर. आर. पाटील आणि बाजार समिती संचालक डी. जी. भास्कर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. नंदकुमार गोंधळी, सोमनाथ घोडेराव, विलास भास्कर, रतन कांबळे, रमेश पाचगावकर, प्रकाश अंगरखे, अब्बास शेख आदी उपस्थित होते.

**हर्षवर्धन सामाजिक कल्याण संस्था**

राजर्षी शाहू वसाहत येथील हर्षवर्धन सामाजिक कल्याण संस्थेच्या वतीने संविधान दिन साजरा झाला. अनिल म्हमाने यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रणजितसिंह औंधकर, प्रशांत अवघडे, शिवाजी औंधकर, बाबासाहेब बनसोडे, जितेंद्र शिंदे, रमेश डवाळे आदी उपस्थित होते.

**गांधीनगरमध्ये अभिवादन**

**गांधीनगर :** रिपब्लिकन पक्ष आठवले गटाच्या वतीने गांधीनगर (ता. करवीर) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष अंकुश वराळे, ग्रामविकास अधिकारी विजय माळी, तानाजी इंगवले, बाळू पोवार, कुमार भोसले, गणेश कांबळे यांच्यासह कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

**ग्रामपंचायतीमध्ये चर्चासत्र**

गांधीनगर ग्रामपंचायतीमध्ये संविधानाबाबत चर्चासत्र झाले. प्रभारी सरपंच सोनी सेवलानी यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. ग्रामविकास अधिकारी विजय माळी यांनी स्वागत केले.

चर्चासत्रात माजी उपसरपंच प्रशांत कुलकर्णी, अमोल एकळ, सचिन जोशी, धीरज तेहल्यानी यांनी सहभाग घेतला. काकासाहेब हावळ, निवास लोखंडे, अरविंद तामगावे, अरुण अवघडे, राजू येडाले आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी संविधान दिन आणि शहीद दिनाच्या निमित्ताने भारतीय संविधानकर्ते आणि वीर शहीद जवान यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठात कुलगुरू डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांच्या हस्ते संविधानाची प्रास्ताविका, संविधानाची मूळ प्रत यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी '२६/११'च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांसह अन्य शहीदांच्या स्मृतिप्रतिमांनाही कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. शिवराज थोरात, व्ही.एन. शिंदे, गजानन पळसे, अजित चौगुले, एस.एस. महाजन, एम.एस. देशमुख, आर.व्ही. गुरव, नमिता खोत, अभय जायभाये, प्रकाश पवार, के.डी. सोनावणे, पी.बी. बिलावर आदी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात शहिदांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संविधान दिन आणि शहीद दिनानिमित्त शुक्रवारी सकाळी भारतीय संविधानकर्ते आणि वीर शहीद जवान यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते संविधानाची प्रास्ताविका, संविधानाची मूळ प्रत यांना अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

यावेळी '२६/११'च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांसह अन्य शहीदांच्या स्मृतिप्रतिमांनाही कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. डॉ. शिवराज थोरात यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे उपस्थित होते.

लोकमत

# तंत्रज्ञान अधिविभागातील १९५ विद्यार्थ्यांना नोकरी

## शिवाजी विद्यापीठ : विविध कंपन्यांमध्ये निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी) ११५ विद्यार्थ्यांना गेल्या महिन्यात नोकरी मिळाली आहे. त्यांची वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यात निवड झाली आहे. या कंपन्यांमध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस, कॉग्निझंट टेक्नॉलॉजिस, ॲम्मडॉकस, कॅपजेमिनी, इन्फोसिस , एम्प्सिस, आटोस ग्लोबल, टाटा एलॅक्सि, आदींचा समावेश आहे.

सॉफ्टवेअरसह टेलिकम्युनिकेशन, एम्बईड्डेड सिस्ट्म्सि, नेटवर्किंगमधील नोकरीचा समावेश आहे. तंत्रज्ञान अधिविभागातील अनेक विद्यार्थ्यांनी तीन ते चार कंपन्याच्या मुलाखतीमध्ये यश मिळविले आहे. अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचीदेखील आंतरराष्ट्रीय कंपन्यात निवड झाली. उर्वरित विद्यार्थ्यांना मुलाखतीच्या अजून संधी मिळणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी . शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचे काम सुरू आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. एस. बी. सादळे, आदींचे मार्गदर्शन लाभले.



नोकरीसाठी या विद्यार्थ्यांना ॲप्टिट्यूड टेस्ट, मुलाखत, आदी परीक्षा द्याव्या लागल्या. त्यातील गुणवत्तेनुसार त्यांची कंपन्यांनी गेल्या महिन्यामध्ये निवड केली आहे.

-डॉ. आर. के. कामत

लोकमत




# 'समतेशी करार'चे आज प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ज्येष्ठ पत्रकार मधू कांबळे लिखित 'समतेशी करार' या पुस्तकाचे प्रकाशन आणि त्यावरील चर्चेचा कार्यक्रम शनिवारी सकाळी साडेदहा वाजता शाहू स्मारक भवनमध्ये होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर सेक्युलर मूव्हमेंटचे कार्याध्यक्ष भरत शेळके प्रमुख उपस्थित असणार आहेत. विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील प्रा. प्रकाश पवार, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर, सेक्युलर मूव्हमेंटचे अध्यक्ष प्रा. गौतमीपुत्र कांबळे प्रमुख वक्ते आहेत.